जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017

पुण्यनगरी

# मुंबई विद्यापीठातील अडचणी सोडवणार

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे



**कोल्हापूर / प्रतिनिधी :** मुंबई विद्यापीठातील विद्यार्थी सुविधा केंद्रातील अडचणी सोडवून विद्यार्थी त्रासमुक्त कसे होतील, या गोष्टीकडे लक्ष देण्यावर माझा भर राहील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

मुंबई विद्यापीठाच्या निकालात होणाऱ्या दिरंगाईमुळे निर्माण झालेल्या वादानंतर कुलगुरू डॉ. संजय देशमुख अचानक रजेवर गेले आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा अतिरिक्त कारभार सोपवण्यात आला आहे. देशमुख यांची रजा संपेपर्यंत डॉ. शिंदे मुंबई विद्यापीठाचा कारभार पाहणार आहेत.

डॉ. शिंदे म्हणाले, मुंबई विद्यापीठाचे विविध अभ्यासक्रमांचे प्रलंबित निकाल त्वरित लावले जावेत, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. लवकरच निकाल कसे लावले जातील, यात मी लक्ष घालणार आहे. त्याचबरोबर मुंबई विद्यापीठाच्या सुविधा केंद्रातील अडचणीही कशा सुटतील, याकडेही लक्ष घातले आहे. त्याचाही निपटारा केला जाईल. माझ्याकडे कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची जबाबदारी आहे. त्यात आता मुंबई विद्यापीठाची अतिरिक्त जबाबदारी आली आहे.

सर्व कर्मचारी, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने दोन्ही जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडेन. डॉ. देशमुख यांची रजा असेपर्यंतच माझ्याकडे अतिरिक्त कार्यभार असल्याने त्यांची रजा संपल्यावर मुंबई विद्यापीठाच्या जबाबदारीतून मी मुक्त होईन.

12 AUG 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. डी. टी. शिर्के प्र-कुलगुरू

## राज्यपालांचे आदेश; सर्व घटकांच्या हिताला प्राधान्य : डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. दिगंबर तुकाराम ऊर्फ डी. टी. शिर्के यांची नियमित प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली. राज्यपाल तथा कुलपती विद्यासागर राव यांनी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीचा आदेश जारी केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यकाळाइतका डॉ. शिर्के यांचा कार्यकाळ असेल.

निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाच्या हितासाठीच आजपर्यंत काम केले आहे. प्र-कुलगुरूपदाच्या कारकीर्दीतही विद्यापीठाच्या आणि सर्व संबंधित घटकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य राहील. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यापीठाच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणार आहे.''

डॉ. शिर्के मूळचे वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील असून, त्यांचे सुरवातीचे शिक्षण वडगाव हायस्कूलमध्ये झाले. वारणा महाविद्यालय, तसेच विवेकानंद महाविद्यालयातून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या सांख्यिकी अधिविभागातून १९८७ मध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्याचवर्षी ज्युनिअर रिसर्च फेलोशिप प्राप्त करून ते संशोधक म्हणून, तर १९९० मध्ये सांख्यिकी विभागात अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. ते मार्च २००५ मध्ये प्राध्यापक झाले. सांख्यिकी विभागाच्या प्रमुखपदाबरोबरच त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिवपदही भूषविले. त्यांना अध्यापनाचा २७ वर्षांचा, संशोधनाचा ३० वर्षांचा; तर अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेसह विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवरील प्रशासकीय कामकाजाचा १५ वर्षांहून अधिक अनुभव आहे.


डॉ. शिर्के

### डॉ. शिर्के यांच्याविषयी...

- ५५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित
- १२ विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी मार्गदर्शन
- देश-विदेशातील ५० परिषदांना उपस्थिती
- सहा परिषदांच्या आयोजनात पुढाकार



12 AUG 2017

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. शिर्के

## कुलपतींचा आदेश लागू, अभ्यासू संशोधकाचा गौरव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या नियमित प्र-कुलगुरूपदी डॉ. दिगंबर तुकाराम ऊर्फ डी. टी. शिर्के यांची नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांनी शिर्के यांच्या नियुक्तीचा आदेश लागू केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यकाळाइतकाच डॉ. शिर्के यांचा कार्यकाळ असणार आहे.

डॉ. शिर्के हे मूळचे वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील असून वारणा महाविद्यालय तसेच विवेकानंद महाविद्यालयातून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले.

त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या सांख्यिकी अधिविभागातून १९८७ मध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्याचवर्षी ज्युनिअर रिसर्च फेलोशिप प्राप्त करून ते संशोधक म्हणून विभागात रूजू झाले.



१९९० मध्ये सांख्यिकी विभागात ते अधिव्याख्याता म्हणून रूजू झाले. मार्च २००५ मध्ये ते प्राध्यापक झाले. सांख्यिकी विभागाच्या प्रमुखपदाबरोबरच त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिवपदही भूषवले आहे.

त्यांना अध्यापनाचा २७ वर्षांचा, संशोधनाचा ३० वर्षांचा तर अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेसह विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावरील प्रशासकीय कामकाजाचा १५ हून अधिक वर्षांचा अनुभव आहे. विद्यापीठाने त्यांना २०११ मध्ये सर्वोत्कृष्ट अध्यापक म्हणूनही सन्मानित केले आहे.

डॉ. शिर्के यांचे ५५ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १२ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. अमेरिका, स्वित्झर्लंड, पोर्तुगाल, जर्मनी, थायलंड, सिंगापूर, मलेशिया आदी देशांसह भारतातील ५० परिषदांना ते उपस्थित राहिले आहेत. सहा परिषदांच्या आयोजनात त्यांनी पुढाकार घेतला आहे.

### विद्यापीठसह संबंधित घटकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य

निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या हितासाठीच आजपर्यंत काम केले आहे. प्र-कुलगुरू पदाच्या कारकीर्दीतही विद्यापीठाच्या व सर्व संबंधित घटकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य राहील. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार या विद्यापीठाच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणार आहे.

नेंदरलँडच्या, इंटरनॅशनल स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटसह इंटरनॅशनल इंडियन स्टॅटिस्टिकल असोसिएशन व इंडियन सोसायटी फॉर प्रोबॅबिलिटी अँन्ड स्टॅटिस्टिक्सचे ते आजीव सदस्य आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017

महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. शिर्के

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची नियमित प्रकुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल तथा कुलपती विद्यासागर राव यांनी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीचा आदेश शुक्रवारी जारी केला आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यकालाइतकाच डॉ. शिर्के यांचा कार्यकाळ असेल, असे या नियुक्तीपत्रात नमूद केले आहे.

डॉ. शिर्के मूळचे वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले) येथील आहेत. १९९०मध्ये विद्यापीठात सांख्यिकी विभागात अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. सांख्यिकी विभागाच्या प्रमुख पदाबरोबरच त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिवपदही भूषविले आहे. त्यांना अध्यापनाचा २७ वर्षांचा, संशोधनाचा ३० वर्षांचा तर अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेसह विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवरील प्रशासकीय कामकाजाचा १५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. विद्यापीठाने त्यांना २०११मध्ये सर्वोत्कृष्ट अध्यापक म्हणूनही सन्मानित केले. त्यांचे ५५ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डी. टी. शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के यांची नियुक्ती झाली आहे. कुलपती सी. विद्यासागर राव यांनी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीचा आदेश केला आहे. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

काल, गुरुवारी जारी करण्यात आलेल्या या आदेशात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६च्या कलम १३ (६) अन्वये कुलपतींनी डॉ. शिर्के यांची निवड केल्याचे म्हटले आहे. हा आदेश विद्यापीठाला शुक्रवारी प्राप्त झाला. गेल्या पाच महिन्यांपासून प्रभारी प्र-कुलगुरुपदी डॉ. शिर्के कार्यरत होते. त्यांचे मूळ गाव वाठार तर्फ वडगांव (ता. हातकणंगले) आहे. सन १९९०मध्ये अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. सांख्यिकी विभागप्रमुख, विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिवपदी त्यांनी काम केले आहे. त्यांना अध्यापनाचा २७ वर्षांचा, संशोधनाचा ३० वर्षांचा अनुभव आहे.



> शिवाजी विद्यापीठाच्या हितासाठीच आजपर्यंत काम केले आहे. प्र-कुलगुरुपदी काम करतानाही विद्यापीठ आणि सर्व संबंधित घटकांच्या हिताला प्राधान्य राहील.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. दिगंबर तुकाराम ऊर्फ डी. टी. शिर्के यांची नियमित प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती विद्यासागर राव यांनी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीचा आदेश दिला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यकाळाइतका डॉ. शिर्के यांचा कार्यकाळ असेल.



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ च्या कलम १३ (६) अन्वये कुलपतींनी डॉ. शिर्के यांची निवड केल्याचे आदेशात म्हटले आहे. सध्या मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदी असलेले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी डॉ. शिर्के यांचे ▶▶ पान २ वर

शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. शिर्के

अभिनंदन केले आहे. निवडीनंतर प्रतिक्रिया देताना प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या हितासाठीच आजपर्यंत काम केले आहे. प्र-कुलगुरुपदाच्या कारकीर्दीतही विद्यापीठाच्या आणि सर्व संबंधित घटकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य राहील. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार या विद्यापीठाच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणार आहे. कुलपतींनी आपल्यावर दर्शविलेल्या विश्वासाबद्दल डॉ. शिर्के यांनी त्यांना धन्यवाद दिले.

डॉ. शिर्के हे मूळचे वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील असून त्यांचे सुरुवातीचे शिक्षण वडगाव हायस्कूलमध्ये झाले. वारणा महाविद्यालय तसेच विवेकानंद महाविद्यालयातून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या सांख्यिकी अधिविभागातून १९८७ साली पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्याचवर्षी ज्युनिअर रिसर्च फेलोशिप प्राप्त करून ते संशोधक म्हणून विभागात रुजू झाले. १९९० मध्ये सांख्यिकी विभागात ते अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. मार्च २००५ मध्ये ते प्राध्यापक झाले. सांख्यिकी विभागाच्या प्रमुखपदाबरोबरच त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिवपदही भूषविले आहे. त्यांना अध्यापनाचा २७ वर्षांचा, संशोधनाचा ३० वर्षांचा, तर अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेसह विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवरील प्रशासकीय कामकाजाचा १५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. विद्यापीठाने त्यांना २०११ मध्ये सर्वोत्कृष्ट अध्यापक म्हणूनही सन्मानित केले आहे. डॉ. शिर्के यांचे ५५ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १२ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. अमेरिका, स्वित्झर्लंड, पोर्तुगाल, जर्मनी, थायलंड, सिंगापूर, मलेशिया आदी देशांसह भारतातील ५० परिषदांना ते उपस्थित राहिले आहेत. सहा परिषदांच्या आयोजनात त्यांनी पुढाकार घेतला आहे. नेदरलँडच्या इंटरनॅशनल स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटसह इंटरनॅशनल इंडियन स्टॅटिस्टिकल असोसिएशन आणि इंडियन सोसायटी फॉर प्रोबॅबिलिटी अँन्ड स्टॅटिस्टिक्सचे ते आजीव सदस्य आहेत.

12 AUG 2017
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डी.टी. शिर्के यांची शिवाजी विद्यापीठाच्या पूर्णवेळ प्र-कुलगुरूपदी नियुक्ती

प्रतिनिधी, कोल्हापूर



**शिवाजी विद्यापीठाचे** प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. दिगंबर तुकाराम ऊर्फ डी.टी. शिर्के यांची पूर्णवेळ प्र-कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती के. विद्यासागर राव यांनी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीचे आदेश जारी केले आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यकाळाइतका डॉ. शिर्के यांचा कार्यकाळ असेल, अशी माहिती शुक्रवारी देण्यात आली.

या निवडीनंतर डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या हितासाठीच आजपर्यंत काम केले आहे. प्र-कुलगुरू पदाच्या कारकीर्दीतही विद्यापीठाच्या आणि सर्व संबंधित घटकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य राहील.

डॉ. शिर्के हे मूळचे वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील आहेत. १९९० मध्ये सांख्यिकी विभागात ते अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. मार्च २००५ मध्ये ते प्राध्यापक झाले. सांख्यिकी विभागाच्या प्रमुख पदाबरोबरच त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिवपदही भूषविले आहे. त्यांना अध्यापनाचा २७ वर्षांचा, संशोधनाचा ३० वर्षांचा तर अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेसह विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांवरील प्रशासकीय कामकाजाचा १५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. विद्यापीठाने त्यांना सन २०११ मध्ये सर्वोत्कृष्ट अध्यापक म्हणूनही सन्मानित केले आहे.

डॉ. शिर्के यांचे ५५ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १२ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. अमेरिका, स्वित्झर्लंड, पोर्तुगाल, जर्मनी, थायलंड, सिंगापूर, मलेशिया आदी देशांसह भारतातील ५० परिषदांना ते उपस्थित राहिले आहेत. सहा परिषदांच्या आयोजनात त्यांनी पुढाकार घेतला आहे. नेदरलँडच्या इंटरनॅशनल स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटसह इंटरनॅशनल इंडियन स्टॅटिस्टिकल असोसिएशन आणि इंडियन सोसायटी फॉर प्रोबॅबिलीटी अन्ड स्टॅटिस्टिक्सचे ते आजीव सदस्य आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. शिर्के

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. डी. टी. शिर्के यांची नियुक्ती झाली आहे. राज्यपाल विद्यासागर राव यांनी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीचा आदेश दिला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या इतका डॉ. शिर्के यांचा कार्यकाळ असेल. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ च्या कलम १३ (६) अन्वये कुलपतींनी डॉ. शिर्के यांची निवड केली आहे. डॉ. शिर्के हे प्रभारी प्र-कुलगुरू म्हणून आजपर्यंत काम पहात होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017
तरूण भारत

# विद्यापीठात १५ रोजी 'महादेवभाई' अभिवाचनाचा प्रयोग

**कोल्हापूर :** गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने प्रत्ययनिर्मित (हौशी नाट्य कला केंद्र) आणि डॉ. शरद भुताडिया संकलित 'महादेवभाई' हा अभिवाचनाचा प्रयोग शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट हॉल येथे १५ रोजी सकाळी सव्वाआठ वाजता आयोजित करण्यात आला आहे. महादेवभाई हे महात्मा गांधीजींचे मानसपूत्र होते. महात्मा गांधींशी असणाऱ्या स्नेहामुळे ते सतत त्यांच्याबद्दल चिंतन करत. त्यामुळेच या अभिवाचनातून महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्व, विचार व कार्याचा परिचय होणार आहे. महादेवभाई यांचे १५ ऑगस्ट १९४२ रोजी निधन झाले. त्यांच्या मृत्यूला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने गांधी अभ्यास केंद्राने हा कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017

सकाळ



कोल्हापूर : डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना डॉ. डी. टी. शिर्के, अभयकुमार साळुंखे, डॉ. एस. वाय. होनगेकर, पी. एस. चव्हाण

# डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम

कोल्हापूर, ता. ११ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठ परिसरातील त्यांच्या पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सहसचिव प्राचार्य पी. एस. चव्हाण, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. बी. के. गोसावी, प्रा. संदीप पाटील, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. सौ. यू. आर. हिरकुडे आदी उपस्थित होते. विवेकानंद महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमात डॉ. साळुंखे, सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमांचे पूजन झाले. प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते पुस्तकांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. सचिव शुभांगी गावडे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, हितेंद्र साळुंखे, प्रा. किरण पाटील, प्रा. बी. के. गोसावी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. होनगेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# कृषी-उद्योग हाच कोल्हापूरच्या विकासाचा पाया

## मेजर ग्रॅहॅमच्या अहवालात मांडणी : सोमवारी होणार प्रकाशन सोहळा; तत्कालीन संस्थानचीही सविस्तर माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा हा सध्या चारीही बाजूंनी उभारलेले उद्योग, कृषी आणि त्यांवर आधारित व्यवसायांनी बरकतीला आला असला तरी त्याचा पाया खूप आधीच घातला गेला आहे. १७० वर्षांपूर्वीही उत्पादक क्षेत्रातील उत्पन्न हे सर्वाधिक, तर त्याखालोखाल कृषी क्षेत्रातील उत्पन्न होते. तत्कालीन पोलिटिकल सुपरिंटेंडेंट ऑफ कोल्हापूर मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी तयार केलेल्या सांख्यिकीय अहवालात हे नमूद करण्यात आले आहे. 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑफ द प्रिन्सिपलिटी ऑफ कोल्हापूर' या त्यांच्या अहवालात तत्कालीन कोल्हापूर संस्थानची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

ग्रॅहॅम यांच्या या अहवालाचे सोमवारी (१४ ऑगस्ट) सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहामध्ये प्रकाशन करण्यात येणार आहे. शाहू संशोधन केंद्राचे संचालक, प्रख्यात इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. यावेळी शाहू छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे हे अध्यक्षस्थानी असतील.

सन १८४४ साली ब्रिटिशांचे तत्कालीन राजकीय कारभारी दाजीकृष्ण पंडित (ज्यांच्या काळात गरुड मंडप उभारण्यात आला) त्यांच्याविरोधात (पान ४ वर)



### वार्षिक उत्पन्नाची विभागणी

| | |
|---|---|
| उत्पादक / कारखानदार | १४ लाख ९८ हजार ७४२ |
| हस्तकौशल्य उत्पादन | ०२ लाख ३३ हजार ९५९ |
| शेतीतून मिळणारे उत्पन्न | १४ लाख ९२ हजार ८५७ |

### कोल्हापूर नाव कसे पडले?

कोल्हासुर राक्षसाचा वध केला गेला आणि त्यावरुन कोल्हापूर नाव पडले. जगप्रलयावेळी देवी अंबाबाईनि आपल्या गदेवर (कूर) हे गाव तोलले म्हणून करवीर, कोल्हापूर नाव पडले आणि कमळाला संस्कृतमध्ये कुल्हर म्हणतात. हे तळ्यांचे गाव होते. तळ्यांत मोठ्या प्रमाणावर कमळे होती. या कुल्हरवरुन कोल्हापूर असे नाव पडले असावे, अशा तीन शक्यता वर्तविल्या आहेत.




मेजर ग्रॅहम यांच्या प्रकाशित करण्यात येणाऱ्या ग्रंथाचे मुखपृष्ठ.

### कोल्हापूर शहराची तत्कालीन लोकसंख्या

| | |
|---|---|
| ब्राह्मण | ७१७० |
| जैन | ११८५ |
| लिंगायत | २०३० |
| मराठे | २१,२७८ |
| हिंदू अन्य जाती | ८१०५ |
| मुस्लिम | ३६१९ |



मेजर ग्रॅहॅम यांचा हा अहवाल १६३ वर्षांपूर्वीचा आहे. तो दुर्मीळ आहे. कोल्हापूरच्या दीड पावणे-दोनशे वर्षांपूर्वीच्या सांख्यिकीय आधारावर मांडलेल्या परिस्थितीचा तो दस्तऐवज आहे. परंतु तो सहज उपलब्ध होत नव्हता. ठिकठिकाणांहून त्याची पाने गोळा करावी लागली. अगदी पुण्या-मुंबईपासून याचे पुनर्मुद्रण करण्याची मागणी होत होती. म्हणून गेली तीन-चार वर्षे परिश्रम घेऊन या ग्रंथाचे संपादन आणि पुनर्मुद्रण करण्यात येत आहे.

- डॉ. जयसिंगराव पवार, संचालक, शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017
लोकमत

# कृषी-उद्योग हाच कोल्हापूरच्या विकासाचा पाया

(पान १ वरुन)

बंड पुकारण्यात आले. करवीर प्रदेशातील सामानगड, विशाळगडचे गडकरीही बंडात सामील होते. मात्र, ब्रिटिशांनी ते बंड मोडून काढले आणि त्या ठिकाणी मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांची 'पोलिटिकल सुपरिंटेंडेंट' म्हणून नियुक्ती करण्यात आली. याच वेळी ईस्ट इंडिया कंपनीने जिथे-जिथे कंपनीची सत्ता आहे, तेथील प्रदेशातील लोक, त्यांच्या चालीरीती, उद्योग-व्यवसाय, वाहतूक व्यवस्था, रस्ते, नद्या, वास्तू, उत्पन्नाची साधने यांचे सविस्तर संकलन करण्याचे आदेश दिले.

'उत्तम प्रशासनासाठी अशी सविस्तर सांख्यिकीय माहिती अतिशय उपयुक्त ठरते,' अशी ग्रॅहॅम यांची ही माहिती संकलित करण्यामागील भूमिका होती. यानंतर १८४६ ते १८५४ या कालावधीत ग्रॅहॅम यांनी अतिशय सूक्ष्मपणे माहितीचे संकलन करून हा अहवाल तयार करून पाठवून दिला होता. तोच अहवाल आता पुनर्मुद्रित ग्रंथस्वरूपात वाचकांना उपलब्ध होणार आहे.

या अहवालामध्ये ग्रॅहॅम यांनी कोल्हापूरबाबत काही दिले नाही असे नाही. सर्व प्रकारची इत्थंभूत माहिती या अहवालात आहे. एकीकडे सातारा, दुसरीकडे गोव्यापर्यंत, कोकणात समुद्रापर्यंत आणि बेळगावपर्यंत कोल्हापूर प्रदेश मानला जाई. कोल्हापूर राज्य हे सहा परगण्यांमध्ये विभागले होते. कोल्हापूर, पन्हाळा, भुदरगड, गडहिंग्लज, शिरोळ आणि आळते हे ते सहा परगणे होत. या सहा परगण्यांमध्ये १९ मोठी गावे समाविष्ट होती. त्यामध्ये विशाळगड, बावडा, कागल, कापशी, इचलकरंजी या गावांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2017
पुण्यनगरी

# समाजाच्या प्रगतीत सार्वजनिक ग्रंथालयांचे मोठे योगदान

## – एस. आर. बाहेती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** समाजाच्या प्रगतीमध्ये सार्वजनिक, शैक्षणिक ग्रंथालयांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन अकोला येथील गयादेवी जोशी महाविद्यालयाचे निवृत्त ग्रंथपाल आणि प्राचार्य एस. आर. बाहेती यांनी केले.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित एकदिवसीय कार्यशाळेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पी. डी. राऊत होते.

प्राचार्य डॉ. बाहेती यांनी यावेळी जुनी ग्रंथालये, ग्रंथालयशास्त्र व ग्रंथपाल हे बदलत्या काळानुसार कसे आधुनिक होत गेले याचा आढावा घेतला. तसेच, शासन, ग्रंथालयशास्त्रातील संघटना यांचे योगदान सांगितले.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये एडविन थॉमस इबस्को, मुंबई व मयांक डेढिया, इन्फॉर्मेटिक्स पब्लिशिंग लिमिटेड, बेंगलोर यांनी ई-रिसोर्सवर प्रात्यक्षिकासह माहिती दिली. तृतीय सत्रामध्ये डॉ. नमिता खोत यांनी यूजीसीने ग्रंथपाल प्रवर्गासाठी नव्याने सुचविलेल्या एपीआयबाबत माहिती दिली. यावेळी झालेल्या चर्चासत्रामध्ये पॅनलिस्ट म्हणून प्रशांत कल्लोळी, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर व डॉ. एस. व्ही. थोरात यांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी पीएच.डी. पदवी संपादन केलेल्या ग्रंथपालांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यशाळेस विद्यापीठातील प्राध्यापक तसेच विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांतील ग्रंथपाल असे एकूण १४० प्रतिनिधी उपस्थित होते. ज्ञानस्रोत केंद्र संचालक तथा समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी परिचय करून दिला, तर उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले.

12 AUG 2017

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 87,000 register for SUK's online profiling

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Over 87,000 undergraduate students have registered for Shivaji University, Kolhapur's (SUK) online profiling process said Milind Joshi, system coordinator at SUK. The first year students while applying for admission are asked to create an online profile.

The number includes students from SUK affiliated colleges in Satara, Sangli and Kolhapur districts, he said. Creating online profile includes, divulging details of courses opted, subjects in the course along with basic information such as name of the applicant, their address and name of college.

The basic information is used to generate hall tickets during the semester exams. New students have to fill in information, while old students have to update their information according to their academic progress.

## MANDATORY FOR STUDENTS

- Students need to update their basic information and details of course opted
- Online profiling is a must for new as well as existing students, of conventional (BA, BCom and BSc), and professional (engineering, pharmacy, management) courses



### REQUIREMENTS FOR UPDATING ONLINE PROFILE

- Scanned soft copy of signature and passport size photograph
- E-mail ID
- Statement of marks for previous exams
- Other relevant documents such as caste certificate

Joshi said, "If students fail to update the information, the hall tickets are generated with their old information, which ultimately results in confusion during the exam. This leads to loss of valuable time, for both the university as well as the students."

The online profiling has been made mandatory, after learning from past instances, when the university had witnessed delay in result declaration, due to information not being updated, added the official.

With 87,000 students already creating their profile, the university is waiting to get a response from the remaining students, who are yet to get admission.

The deadline for finishing the online profiling process has already passed. Only students who are yet to get admitted for the courses for which admission process is yet to be completed, will now be allowed to make their profile, he added.

The official said that last year as well, the number of students who had created online profiles was more than 80,000.

On the advantage of making an online profiling, the official said, "The process remains transparent and students can monitor their information by themselves.

Earlier, the colleges used to communicate the students' data through manual paper work. The new online profiling process gives us information of the students in a readymade format."

Another official from the department said that a tutorial is present on the portal to guide students through the process.